REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
व्यापारधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें २.

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २१ जून, १९५० अंक २५

फोनः [illegible] तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

मृत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः —

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें
सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती
आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व
कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि
कोळसा वगैरे.

## दी बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची
जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

स्थापनाः १९२६.
मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.


तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर
(४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी
(७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–
फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची
उत्तम व्यवस्था.


व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.




## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन
वर्क्स लिमिटेड
भिवंडी जि. ठाणें
व्हाया–कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**


## विविध माहिती

**काश्मीरला जाणारे प्रवासी**—मे, १९५० मध्यें काश्मीर पहाण्यास येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येनें उच्चांक गांठला. १९४९ च्या मे महिन्यांत १,७६७ प्रवास परवाने देण्यांत आले होते. गेल्या महिन्यांत ८,००० परवाने देण्यांत आले. दिल्लींतूनच २,५०० प्रवासी आले आणि अमृतसरहून ५,००० प्रवासी आले.

**भारताचा अमेरिकेशीं व्यापार**—१९५० च्या पहिल्या तीन महिन्यांत भारतानें २८,७६,६०,००० रुपये किंमतीचा माल अमेरिकेला निर्यात केला. ह्याच तीन महिन्यांत भारतानें ३१,६५, ८७,००० रुपये किंमतीचा माल अमेरिकेकडून आयात केला निर्यात–आयातींतील हा फरक सुमारें तीन कोटी रुपयांचा आहे.

**ऑस्ट्रेलियांतील तांदुळाचें पीक**—आस्ट्रेलिआचें यंदाचें तांदुळाचें पीक ७०,००० टनापर्यंत येईल असें समजतें. मे अखेर बहुतेक सर्व पिकाची कापणी करण्यांत आली आहे. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलिआंत ६७,००० टन तांदूळ झाला होता. १९४४ मध्यें ऑस्ट्रेलिआंत सर्वांत अधिक म्हणजे ७५,००० टन तांदूळ झाला होता. ऑस्ट्रेआंतील तांदुळाचें दर एकरीं उत्पादन दोन ते तीन टन आहे.

**युगोस्लाव्हिआ–जर्मनी व्यापार**—प. जर्मनीच्या सरकारशीं असलेले व्यापारी संबंध अधिक वाढविण्याचा प्रयत्न युगोस्लाव्हिआचें सरकार करीत आहे. युगोस्लाव्हिआला आपला पंच वार्षिक औद्योगिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी भांडवली मालाची फार गरज आहे. कॉमिन्फॉर्म ह्या आंतरराष्ट्रीय संस्थेंतून फुटून बाहेर पडल्यापासून युगोस्लाव्हिआला रशियाकडून होणारी आर्थिक मदत बंद झाली आहे.

**पाकिस्तानांत वनस्पती तुपाचा कारखाना**—पाकिस्तानांतील भावलपूर संस्थानांत वनस्पति तुपाचा कारखाना ह्या वर्षअखेर निघणार आहे, त्यांत २५,००० टन सरकी गाळून दर वर्षी ३,५०० टन तेल तयार करण्यांत येणार आहे. त्याशिवाय दर वर्षी ३,००० टन वनस्पती तूप आणि १४,००० टन पेंडही तयार करण्यांत येईल. गुरांना लागणारी पेंडही ५५,००० टन इतकी तयार होऊं शकेल; परंतु त्यासाठीं लागणाऱ्या कांहीं कच्च्या मालाचा पुरवठा होण्यावर पेंडीचें उत्पादन अवलंबून आहे.

**योगी ड्यूक आणि डचेस**—प. युरोपांत अलिकडे योग विद्या लोकप्रिय होत चालली आहे. विंडसरचे ड्यूक आणि डचेस योगासनें करूं लागलीं आहेत. एक फ्रेंच नर्तिका ड्यूक साहेबांना आपलें वजन फार वाढल्याचें सांगत असतां, त्यांनीं तिला योगासनें करण्याचा सल्ला दिला. ड्यूक व डचेस ह्यांना शीर्षासन चांगलें जमूं लागलें आहे.

**मलबारसाठी ब्रह्मदेशाचा तांदूळ**—चालू महिन्यांत ब्रह्मदेशांतून येणारा ८,००० टन तांदूळ भारतीय सरकारनें मलबारला देण्याचें ठरविलें आहे. मलबारमधील धान्यविषयक परिस्थिती खालावल्यामुळें उत्तर प्रदेश सरकारकडूनही कांहीं धान्य मलबारला पुरविण्यांत येणार आहे.

**सीलोनमधील चहाचा खप**—सीलोनमध्यें दरवर्षी सरासरी १,४५,००,००० पौंड चहा खपतो, असें समजतें. अमेरिकेंत आणि कॅनडांत चहा पिण्याविषयीं प्रचार जोरांत चालू असल्यामुळें जगांतील चहाचा खप वाढेल असा अंदाज सीलोन टी प्रॉपगॅंडा बोर्डाच्या अहवालांत करण्यांत आला आहे.

**शतायुषी पक्षी**—लंडन येथील प्राणीसंग्रहालयांतील 'कोकॅटो' जातीचा एक पक्षी नुकताच मरण पावला. हा पक्षी ऑस्ट्रेलिआंतून आणण्यांत आला होता. तो १०० वर्षांचा होता असें म्हणतात. इतक्या वयांत सुद्धां तो चपळ असून मरणाच्या थोडा वेळ आधीं नेहमींप्रमाणें नाचत होता.

**डॉक्टर्सच्या गळ्यांत छोटासा रेडिओ**—न्यूयॉर्कमधील डॉक्टर्सच्या गळ्यांत ६ औंस वजनाचा एक छोटा रेडिओ बांधण्यांत येणार आहे. हा रेडिओ प्लॅस्टिकचा केलेला असून आणीबाणीच्या वेळीं डॉक्टर्सना बोलाविण्यासाठी त्याचा उपयोग केला जाणार आहे. ह्या रेडिओ सर्व्हिसमध्यें २०० डॉक्टर्सनीं आपलीं नांवें नोंदविलीं आहेत. दवाखान्याबाहेर फिरतीवर गेल्यावर मधून मधून रेडिओ फक्त ऐकण्याचेंच काम डॉक्टर्सना करावें लागेल. जरूर लागेल तेव्हां डॉक्टर्सचे नंबर एक सारखे ध्वनिक्षेपित करण्यांत येणार आहेत.

**भारतांतील यंत्रांचें उत्पादन**—१९४९ सालीं २,००,००० अश्वशक्ती उत्पन्न करूं शकणाऱ्या इलेक्ट्रिक मोटार्स भारतांत तयार झाल्या. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या शक्तीच्या उत्पादनाच्या दृष्टीनें विचार करतां १९४९ सालीं ४,६०० डिझेल एंजिन्स तयार झालीं. १९४८ मध्यें ३,४०० एंजिन्स करण्यांत आलीं होतीं.

**नवीन कॅमेराचा शोध**—अमेरिकेच्या विमानदलानें एक नवीन प्रकारचा कॅमेरा बनविला आहे. ह्या कॅमेऱ्यानें १०,००० फूट उंचीवरून खालच्या २६ मैल पट्ट्याचा फोटो दोन सेकंदांत घेतां येतो. फोटोंत येणाऱ्या जमिनीच्या पट्ट्याची रुंदी तीन मैल असते.

**३५ टक्के विद्यार्थ्यांना क्षय**—मध्य भारतांतील ५५,००० विद्यार्थ्यांची 'बी. सी. जी.' हें क्षयरोग प्रतिबंधक औषध टोचण्यापूर्वी वैद्यकीय परीक्षा करण्यांत आली. इंटरमधील २१,००० विद्यार्थ्यांपैकीं ७,४०० विद्यार्थ्यांना क्षयाची भावना असल्याचें तपासणींत आढळून आलें. इंटरमधील २१० शाळांमधील हीं मुलें होतीं.

**नवीन पोस्ट कार्ड**—ता. १ जुलै पासून अर्धा आणा आकार छापलेलीं पोस्टाचीं कार्डे पोस्ट ऑफिसांतून मिळूं लागणार आहेत. ह्या कार्डांचा उपयोग फक्त गांवांतल्या पत्रव्यवहाराकरतां करावयाचा असल्यानें त्यावर 'लोकल डिलिव्हरी' असे शब्द छापण्यांत येणार आहेत.

**काश्मीरमध्यें तांदुळाचें संशोधन केंद्र**—काश्मीरमधील तांदूळ संशोधन केंद्राची मुदत इंडिअन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्च कडून पुढील मार्च पर्यंत वाढविण्यांत आली आहे. केंद्रासाठीं १५,००० रुपये खर्च येणार असून त्यापैकीं अर्धा कौन्सिल सोसणार आहे.


—सर्व प्रांतांतील— सुती–गरम–रेशमी —खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ ढमढेरे बोळाजवळ, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २१ जून, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परराष्ट्रीय व्यापारांत समतोलपणा साधण्यासाठी काय करावें ?

एप्रिल महिन्याचे परराष्ट्रीय व्यापाराचे आंकडे प्रसिद्ध झाले असून त्यावरून असें दिसून येतें कीं आयात रु. ३८ कोटी ५५ लक्ष किंमतीची होऊन निर्यात रु. ३१ कोटी २९ लक्ष इतकी झाली. म्हणजे व्यापारी हिशेबांत रु. ७ कोटी २६ लक्ष इतकी प्रतिकूल तफावत आली. वास्तविक गेल्या ऑक्टोबरपासून सतत सहा महिने व्यापारी हिशेबांत अनुकूल तफावत येत होती. परंतु एप्रिल महिन्याच्या प्रतिकूल तफावतीमुळें निराश होण्याचें कारण नाहीं. याचें कारण असें कीं कांहीं विशिष्ट परिस्थितीमुळें एप्रिल-मध्यें मालाची निर्गत कमी झाली व तशाच कांहीं विशिष्ट कारणांमुळें परदेशांतून मालाची आयात जास्त झाली. कलकत्ता शहरांतील अशांततेच्या वातावरणाचा परिणाम तागाच्या निर्गती-वर झालेला दिसून येतो. मार्च व फेब्रुवारी महिन्यांत अनुक्रमें ७० हजार टन व ६३ हजार टन याप्रमाणें तागाची निर्गत झाली होती; परंतु एप्रिलमध्यें फक्त ४८ हजार टन ताग निर्गत झाला. तागाच्या कमी निर्गतीमुळेंच निर्गत व्यापारांत सुमारें रु. ६ कोटींची तूट आली. दुसरी गोष्ट म्हणजे चहाची निर्गत गेले कांहीं महिने व्हावी तितक्या समाधानकारक प्रमाणांत झाली नाहीं. परंतु आतां नुकत्याच झालेल्या ठोक विक्रीच्या करारानुसार परदेशांत चहा जास्त प्रमाणांत जाऊं लागेल असा अंदाज आहे. आतां एप्रिल महिन्यांत आयात व्यापार वाढण्याचें कारण असें कीं आयात-नियंत्रणाच्या धोरणाच्या दृष्टीनेंहि ११ व १५ नंबरच्या लायसेन्सच्या मुदतीची एक महिन्यानें वाढ करण्यांत आली. आयातीबद्दलची ही सवलत हिंदची एकंदर व्यापारी देण्याची परिस्थिति विचारांत घेऊनच करण्यांत आली आहे. अमेरिकेकडून कापसाची आयातहि यामुळें जास्त प्रमाणांत झाली. गेल्या महिन्याच्या सुरवातीपर्यंत चार लाखाहून जास्त कापसाच्या गांठींची आयात झाली. गेल्या सहा महिन्यांत विशेषतः कापड, कच्चीं कातडीं, कच्चा कापूस व कॉटन वेस्ट, आळशीचें तेल इ. मालाची निर्गत साधारणपणें वाढत्या प्रमाणांत आहे.

परराष्ट्रीय व्यापाराच्या देण्यासाठीं हल्ली सरकार स्वतंत्र रीतीनें अंदाज बांधीत असतें व त्या दृष्टीनें सामान्यपणें १९५५ पर्यंत परराष्ट्रीय व्यापारावरील नियंत्रण चालू राहावयाचें असलें तरी दरमहा बदलणारी परिस्थिति विचारांत घेऊन आयातीबद्दलच्या धोरणांतहि फेर-विचार केला जातो. हें तत्त्वाच्या दृष्टीनें योग्य असलें तरी आपली आयात करण्याची पात्रता ही अंतिम दृष्ट्या आपल्या निर्गतीच्या यशस्वितेवरच अवलंबून आहे हें विसरून चालणार नाहीं. निर्गतीचें यश हें विशेषतः आपल्या मालाच्या किंमतीवर अवलंबून रहाणार आहे. अवमूल्यनामुळें मालाच्या किंमती उतरल्या असल्या तरी त्या हिंदच्या अर्थव्यवहाराला मानवतील एवढ्या प्रमाणांत कायम उतरणें आवश्यक आहे. चहा व ताग या दोन वस्तूंव्यतिरिक्त इतर निर्गत मालाच्या बाबतींत जागतिक स्पर्धेला आपल्याला तोंड द्यावें लागतें. चहाच्या बाबतींतहि इतर आशियांतील देशांतील उत्पादन वाढलें म्हणजे हिंदची आजची मजबूत परिस्थिति तितकीशी कायम रहाणार नाहीं. तेव्हां निर्गत मालाच्या किंमती योग्य प्रमाणांत राखणें, इतर देशांना आकर्षक वाटतील इतक्या त्या उतरविणें, हीच मुख्य गोष्ट परराष्ट्रीय व्यापारांत कायमचा समतोलपणा राखण्याच्या दृष्टीनें महत्त्वाची समजली पाहिजे. एप्रिल महिन्यांतील विशिष्ट कारणांमुळें उद्‌भवलेल्या प्रतिकूल तफावतीनें घाबरून जाण्याचें कारण नाहीं.

## भारताच्या शेतीची सुधारणा

भारताच्या शेतीच्या व्यवसायाचा कार्यक्षमतेच्या दृष्टीनें सर्व जगांत शेवटचा अनुक्रम लागतो; म्हणूनच ह्या देशाच्या भवितव्यतेबद्दल आशा आहे ! १९४४ सालीं कांहीं शेतीच्या तज्ज्ञांनीं भारतांतील शेतकीच्या व्यवसायाची पहाणी केली. ह्या पहाणींत त्यांना असें आढळून आलें कीं तांदुळाचें आणि गव्हाचें दर एकरी उत्पादन भारतांत सर्वांत कमी होतें. चीनमधील शेतीचा व्यवसाय सामान्यपणें भारताच्याच पातळीवर आहे. तरीसुद्धां त्या देशांत तांदुळाचें आणि गव्हाचें दर एकरीं उत्पादन भारतापेक्षां जवळ जवळ दुप्पट आहे. भारतांत दर डोई जितकी जमीन लागवडीखालीं आहे, त्याच्या निम्म्यानें चीनमध्यें आहे. मँचेस्टर गार्डिअनच्या खास वार्ताहरानें केलेली खालील मीमांसा बोधप्रद होईल.

भारताच्या शेतीच्या निकृष्टपणाचें रहस्य न समजण्यासारखें मुळींच नाहीं. १९२७ सालीं भारतीय शेतीसंबंधीं जो लिनलिथगो अहवाल तयार करण्यांत आला, त्यांत ह्यासंबंधींचीं सर्व कारणें दाखविण्यांत आलेलीं आहेत. त्यांतील कांहीं पुढीलप्रमाणें आहेत. बहुतेक सर्व प्रांतांत शेतजमिनीचे तुकडे फार लहान आहेत. जमिनीचा कस नाहींसा झालेला आहे. कृत्रिम खतें फारच थोड्या प्रमाणावर वापरलीं जातात. शेणाचा उपयोग खतासाठी न होता तें जळण म्हणून वापरण्यांत येतें. शेतीचीं अवजारें निकृष्ट प्रतीचीं आणि बीं हलक्या दर्जाचें असतें. युद्धकाळांत रोखीच्या पिकांखालील जमीन कमी करून ती अन्नधान्याच्या लागवडीकडे वापरण्यास सुरवात झाली. 'अधिक धान्य पिकविण्या'च्या मोहिमेचा तो एक भाग होता. परंतु शेतीच्या उत्पादनतंत्रांत खरी सुधारणा मात्र त्यामुळें झाली नाहीं. युद्धाच्या अखेरीस असें एक मत प्रसृत पावलें कीं कृत्रिम खतें वापरून भारतीय शेतीचें पुनरुज्जीवन करतां येईल. इतर देशांतील अनुभव ह्या मताला पुष्टी देणाराच होता. उदाहरणार्थ, जपानमध्यें सल्फेट ऑफ अमोनिआ हें खत वापरून, शेतीचें दर एकरीं सरासरी उत्पादन, १९०० ते १९३७ च्या दरम्यान दुप्पट वाढलें असा अनुभव होता. हा अनुभव लक्षांत घेऊन भारतीय सरकारनें सिंद्री आणि त्रावणकोर ह्या दोन ठिकाणीं कृत्रिम खताचे दोन कारखाने काढण्याचें ठरविलें. ह्या दोन कारखान्यांत मिळून दरवर्षी सुमारें ४,००,००० टन खत तयार होईल असा अंदाज आहे. हें सर्व खत शेतकऱ्यांकडून वापरलें जाईल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. पण तें सर्व कुशलतेनें वापरलें गेलें तरीसुद्धां अन्नधान्यांच्या

उत्पादनांत पुरेशी वाढ झालेली दिसणार नाहीं; कारण वाढत्या लोकसंख्येमुळें अन्नधान्याची गरजही सारखी वाढत आहे.

ह्या परिस्थितींत कांहीं मार्ग निघण्यासारखा नाहीं काय ? भारतांतील शेतकऱ्यानें आपल्या हातांत असणाऱ्या गोष्टी केल्या तरी सुद्धां पुष्कळ कार्य होण्यासारखें आहे. भारताच्या पिकांपैकीं १० टक्के पिकें किडीच्या भक्षस्थानीं पडतात. जवळ जवळ ४० ते ५० लाख टन धान्य अशा रीतीनें हातचें जातें. भारताला जवळ जवळ इतकेंच धान्य परदेशांतून आयात करावें लागतें. हें सर्वच किडीपासून वाचवितां येईल असें नाहीं. तथापि डी. डी. टी. आणि गॅमेक्सेन वापरून अन्नधान्याचा बराच नाश टाळतां येईल. शेतकऱ्यानें अधिक चांगल्या प्रतीचें आणि किडीला न जुमानणारें बीं वापरल्यास दर एकरीं पिकांत वाढ होईल. पंजाबमध्यें अशा प्रकारचें बीं वापरल्यामुळें गव्हाच्या पिकाला भरभराट आलेली दिसून येते. लोखंडी नांगरानें जमीन खोलवर नांगरणें हाही एक उपाय आहे. शेतजमिनींच्या छोट्या तुकड्यांचें एकत्रीकरण करूनहि अन्नधान्याचें उत्पादन लवकर वाढवितां येईल. ह्याशिवाय सांडपाण्याचा अधिक चांगला निचरा करणें, ताली-बांध घालणें, इत्यादि अनेक उपाय योजून भारताला अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होतां येण्यासारखें आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं भारतानें उद्योगप्रधान राष्ट्र होण्याची महत्त्वाकांक्षा सोडून द्यावी. ही महत्त्वाकांक्षा योग्यच आहे, कारण मोठ्या उद्योगधंद्यांशिवाय कोठलेंही राष्ट्र पहिल्या प्रतीचें गणलें जात नाहीं. आर्थिक विकासाच्या दृष्टीनें सुद्धा अशा उद्योगधंद्यांची गरज आहे. कारण, शेतीच्या सुधारणेबरोबर भारतांत कारखान्यांत तयार झालेल्या उपभोग्य मालाची मागणीही पाठोपाठ सहाजिकच वाढेल. ज्या योजनांना फार मोठें भांडवल लागतें अशा योजना इतर दृष्टीनें योग्य असल्या तरी निकडीच्या गरजांच्या दृष्टीनें त्यांचा तितकासा उपयोग होणार नाहीं. अशा मोठ्या योजनांचीं फळें १० वर्षांनीं मिळूं शकतील; परंतु भारताला इतका वेळ नाहीं. तीन ते चार वर्षांत भारतांतील आर्थिक परिस्थिती सुधारणें अत्यंत जरूर आहे.

भारत अन्नधान्याच्या दृष्टीनें जर स्वयंपूर्ण झाला तर सर्व आग्नेय आशिआंतील परिस्थिती सुधारेल. आग्नेय अशिआंत आज ज्या प्रकारच्या आर्थिक कार्यक्रमाची गरज आहे, त्या कार्यक्रमांत भांडवलापेक्षा कुशल तज्ज्ञांचीच अधिक जरूरी आहे. अशा तज्ज्ञांचाही आज तुटवडा आहे ही गोष्ट खरी आहे. शेतीविषयक प्रयोगशाळांतील ज्ञान शेतकऱ्याला उपलब्ध करून देणाऱ्या सामान्य प्रतीच्या तज्ज्ञांचीच आज भारताला गरज आहे. जे कांहीं थोडेसें भांडवल भारताला उभारतां येईल तें टयूब-वेल सारख्या योजनांकडे गुंतविणें फायद्याचें होईल. भारत स्वतःला लागणारें भांडवल थोड्याबहुत प्रमाणांत उभारूं शकेल, परंतु अमेरिकेनें आशियाकरतां एखादी 'मार्शल योजना' आखली तर सर्वच चित्रांत इष्ट असा बदल झपाट्यानें होईल.

---

**कामगारांच्या बदलीचा कंपनीचा अधिकार**–गोदावरी शुगर मिलच्या एका कामगारानें, कंपनीनें आपली बदली कामगार संघटनेंत भाग घेतल्याबद्दल केली असा दावा सोलापूर लेबर कोर्टांत केला होता. ह्या कामगाराला साखरवाडीहून लक्ष्मीवाडींत कामाला पाठविण्यांत आलें होतें. कामाच्या सोयीप्रमाणें कंपनीला आपल्या कामगारांची बदली करण्याचा हक्कच आहे, असा निर्णय लेबर कोर्टानें दिला आहे. ह्या खटल्यांत, बदलीचा हेतू शिक्षा करण्याचा होता हें कामगाराच्या बाजूनें सिद्ध होऊं शकलें नाहीं.


# धी बँक ऑफ सिटिझन्स लि.

स्थापना १९३७

मुख्य कचेरीः १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.

शाखाः बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर

बँक ऑफ सिटिझन्स लि.

बेळगांव.

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

–मिरज–

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.

के. डी. शिराळकर मॅनेजर

## शून्यांतून संपत्ति निर्माण करण्याचा "धंदा"

विरळ इवेंतूनहि पैसे निर्माण करण्याची कला कोणत्याहि देशाचे सरकार आणि ठक लोक ह्यांनाच साधते ! थोडीशी कल्पना आणि पुष्कळसा विश्वास ह्यांच्या आधारावर पैसा उभारणारे कितीतरी लोक होऊन गेले. चलनवाढीबरोबर पैसा मिळविण्याचे अनिष्ट प्रकारहि वाढतात, असा अनुभव आहे. सामान्य नागरिकास जेव्हां पैसा सुलभतेनें मिळूं लागतो, तेव्हां तो त्याचेकडून लबाडीनें काढून घेणारेहि लागलीच निर्माण होतात. जे लोक नेहमी अत्यंत दक्षता बाळगणारे असतात ते सुद्धां अशा प्रसंगीं लबाड लोकांच्या थापांस भुलतात आणि त्यांच्या कारवायांस बळी पडतात. सर्वच देशांत सर्व काळीं येणारा हा अनुभव भारतांत व महाराष्ट्रांतहि आलेला आहे.

लबाडीचे अगदीं प्राथमिक अवस्थेंतील प्रकार भिक्षा मागण्यापेक्षां फारसे वेगळे नसतात व ते तात्काळ ओळखले जातात. चेक वटविण्यास गळी पडणें, हा त्यांतलाच प्रकार आहे. प्रथम दुसऱ्यास फायदा देत राहून त्याला अधिकाधिक पैसे गुंतविण्यास प्रवृत्त करणें आणि योग्य वेळीं ते सर्व बुडवणें, इत्यादि लबाडच्या सर्वांच्या परिचयाच्या असतात. खोट्या दिमाखावर उधारी मिळविण्याचा धंदा कांहीं लोक करीत असतात. आत्मविश्वास आणि भरभराट हीं त्यांच्या अगदीं चेहेऱ्यावरच दिसत असते. खोट्या नोटपेपरचा उपयोग करून आणि चोरलेल्या चेक बुकांतील चेक देऊन माल पळविण्याची त्यांची पद्धति असते. खोट्या किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या भांडवलावर कांहीं लबाड लोक पैसे मिळवीत असतात. पोस्टानें माल पाठविण्याचें कबूल करून हे लोक पैसे जमा करतात. परंतु माल पाठवीतच नाहींत. त्यांपैकीं संघटनाचतुर लोक आपल्या व्यवहाराचें जाळें अशा रीतीनें पसरतात, कीं लबाडी सत्वर उघडकीस येणें कठीण जातें. उदाहरणार्थ, अ, ब आणि क हे एका मोठ्या शहरांत तीन वेगवेगळ्या ठिकाणीं कचेऱ्या उघडतात. प्रत्येकाची स्टेशनरी स्वतंत्र छापून घेतलेली असते आणि खरोखरच त्यांचा मोठा व्यापार असला पाहिजे, असा सर्व उठाव केला जातो. अ दुसऱ्या शहरांतील कारखानदारांकडे मोठी ऑर्डर पाठवतो आणि ब आणि क ची ओळख सांगून तीन महिन्यांची उधारी मागतो. ब आणि क हेहि अशाच रीतीनें एकमेकांची ओळख देऊन दुसऱ्या कारखानदारांकडून माल मिळवितात. माल येताक्षणींच तो स्वस्त दरानें विकून टाकून ते जागा सोडून जातात आणि दुसरीकडे नव्या नांवांनीं व्यवहार सुरू करतात. ह्या तिघांचा कट सिद्ध करणें कठीण जातें. अर्थात, ह्या व्यवहारास थोडेसें भांडवल जरूर असतें आणि तयारींतहि वेळहि बराच जातो.

बँकेच्या आपल्या खात्यांत वेगवेगळ्या इसमांचे निरनिराळ्या बँकांवरील चेक भरत राहून बँकेकडून मोठें कर्ज मिळविण्याचा उद्योग कांहीं लबाड लोक करीत असतात. हे चेक त्या त्या बँकांत वसुलीस जाण्यापूर्वी त्या चेकांची रकम तो त्या त्या बँकांत भरतो. कांहीं महिन्यांनीं, त्याच्या खात्यांतील उलाढालींची रकम खूपच वाढलेली दिसते. ह्या उलाढाली व विश्वास निर्माण करण्याच्या इतर युक्त्या ह्यांच्या आधारें तो बँकेला फसवूं शकतो. त्याचा व्यवहार फार मोठा आहे, असें तो दाखवतो आणि एकाद्या व्यवहाराकरितां रोकड रकम पाहिजे असें सांगून बँकेकडून बराच मोठा ओव्हरड्राफ्ट मिळवतो. पुढें दिवाळें निघतेंच.

ह्या सर्व लबाड्यांकरिता कितीतरी कष्ट व उद्योग करावे लागतात. लबाड्या करणें कठीण व्हावें आणि त्या सत्वर उघडकीस याव्या ह्यासाठी आतां बँका, पोलीस खातीं, इत्यादि कितीतरी दक्षता घेतात. मोठी लबाडी यशस्वी व किफायतशीर होण्याचा संभव फारच कमी असतो. इतर धंद्यांप्रमाणें ह्याहि "धंद्यांत" वाकबगारी मिळविण्यावरच सर्व कांहीं अवलंबून रहातें, हें उघड आहे.

---

### डायरेक्टर ऑफ फूड प्रॉडक्शनची जागा रद्द

भारत सरकारच्या सूचनेवरून मुंबई सरकारनें कांहीं महिन्यांपूर्वी "डॉयरेक्टर ऑफ फूड प्रॉडक्शन" ही जागा निर्माण केली आणि तिचेवर श्री. एस. पी. मोहिते ह्यांची योजना केली. ही जागा अनावश्यक वाटून ती आतां १ जूनपासून रद्द करण्यांत आली आहे. श्री. मोहिते हे डेप्युटि रजिस्ट्रार ऑफ को. सोसायटीज (जॉइंट फार्मिंग) म्हणून काम पाहूं लागतील.

### बँक नोकर लाक्षणिक संप करणार ?

इंडस्ट्रियल ट्रायब्यूनल (बँक डिस्प्यूट्स) च्या अवार्डला "भयंकर विलंब" होत आहे, त्याच्या विरुद्ध निदर्शन करण्यासाठी लाक्षणिक संप घडवून आणण्याचा प्रयत्न फेडरेशन ऑफ बँक एम्प्लॉइज, मुंबई, हे करीत आहे.

### पॉवर लूमवाल्यांना सवलत

ज्या पॉवर लूम कारखान्यांना १९४८ चा फॅक्टरी कायदा लागू नाहीं, त्यांनीं हातमागांसाठीं राखून ठेवलेलें कोणतेंहि कपास-कापड विणण्यास हरकत नाहीं. २½ इंचांपेक्षा ज्यास्त किनारींचीं पातळें, जरी किंवा सोनेरी आर्ट सिल्क यार्नच्या किनारीचीं पातळें, त्याचप्रमाणें रंगीत, पट्ट्याचीं किंवा चेकड पातळें अथवा हनिकोंब टॉवेल्स हीं विणण्यास मिल्स व पावर लूम फॅक्टरीज ह्यांना मनाई करण्यांत आली आहे.

### टिटाघर पेपर मिल्स कं. लि. चे बोनस शेअर्स

टिटाघर कंपनीनें आपल्या रिझर्व्ह फंडांतील ४२,०१,८०० रुपयांचें भाग भांडवलांत रूपांतर करण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी कंपनीचें अधिकृत भांडवल १,००,९०,५०० रु. चें १,४२,९२,३०० रु. करण्यांत येईल. हें वाढलेलें भांडवल भागीदारांस बोनसच्या रूपानें वांटण्यांत येईल. सध्यांच्या प्रत्येक ५ भागांस २ नवे बोनस शेअर्स मिळतील. अशा रीतीनें भांडवल वाढविण्यास व बोनस शेअर्स काढण्यास भारत सरकारनें मंजुरी दिली आहे.

### भारतांतील कागदाचें उत्पादन व उठाव

भारतांत गेल्या वर्षी, १९४९ सालीं, जेवढा कागद खपला त्याच्या फक्त निम्मा देशांतच तयार झाला. एकूण १५ कारखान्यांची उत्पादनक्षमता १,१०,००० टन आहे; त्यांनीं १,००,००० टन कागद निर्माण केला. १९४८ चे मानानें हें उत्पादन ८% अधिक आहे. न्यूजप्रिंट कागद भारतांत तयार होत नाहीं. तो सर्व आयात करावा लागतो. कॅनडा दरसाल ५५,००० टन न्यूजप्रिंट भारताकडे धाडतो.

---

पाकिस्तानांत औद्योगिक प्रदर्शनः—ता. १ सप्टेंबर १९५० पासून ६ आठवडे पर्यंत पाकिस्तानांत एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनाला पाकिस्तान सरकार सक्रिय मदत करीत आहे. बेलजम, फ्रान्स, जपान, झेकोस्लोव्हाकिआ, प. जर्मनी, स्पेन, इटली इत्यादि २० राष्ट्रें वरील प्रदर्शनांत भाग घेणार आहेत.

## भारतांतील सायकलींचा धंदा

( मद्रास येथील रोटरी क्लबमध्यें श्री. एन. के. अय्यर ह्यांनीं 'भारतांतील सायकलींचा धंदा' ह्या विषयावर नुकतेंच एक माहितीपूर्ण भाषण केलें. त्या भाषणांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे. )

श्री. अय्यर म्हणाले:—सायकलीचा शोध एका स्कॉटिश संशोधकानें १८४० सालीं लावला. सध्यां ज्या प्रकारची सायकल आपण वापरतों तशी सायकल १८८५ सालीं एका ब्रिटिश कारखान्यानें प्रथम तयार केली. सध्या सायकलींच्या उत्पादनांत ब्रिटनचा पहिला अनुक्रम लागतो. ब्रिटनमध्यें दरसाल ३,४०,०००० सायकली तयार होतात. अलिकडे जपानही ह्या धंद्यांत स्पर्धा करू लागलें आहे. अमेरिकेच्या उत्पादन पद्धतीचें अनुकरण करून जपान दरवर्षी १०,००,००० सायकली तयार करूं लागले आहे. सायकलींच्या बाजारपेठेंत भारत ही जगांतील एक मोठी बाजारपेठ आहे. युद्धापूर्वी भारत दरवर्षी १,५६,००० सायकली आयात करीत असे. सायकलीला लागणाऱ्या सुट्या भागांची आयात ५६ लाख रुपये किंमतीची होत असे. १९४७ ते १९४९ ह्या काळांत दर वर्षी सरासरी २,४०,००० सायकली आयात करण्यांत आल्या त्यांची किंमत सुमारें २ कोटी, ४३ लाख रुपये होती. सुट्या भागांच्या सरासरी आयातीची किंमत १ कोटी ७२ लाख रुपये होती. १९४९ च्या पहिल्या चार महिन्यांत सुमारें ५०,००० सायकलींची आयात करण्यांत आली. १९४९ च्या मे मध्यें भारत सरकारनें सायकलींच्या व तिच्या सुट्या भागांच्या आयातीला बंदी केली. त्यानंतर ह्यासंबंधी सरकारकडे पत्रव्यवहार करण्यांत आला. चालू सालच्या पहिल्या सहा महिन्यासाठी १,००,००० सायकली आयात करण्याची परवानगी सरकारनें आतां दिली आहे. तथापि सुट्या भागांबाबत सरकारनें अद्यापही कांहीं निर्णय घेतला नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. सरकारच्या ह्या धोरणामुळें सायकली व तिचे सुटे भाग ह्या दोन्हींच्या किंमती फारच वाढल्या आहेत.

भारतांत सायकली बनविण्याचा उद्योगधंदा युद्धकालांत सुरू झाला. युद्ध बंद झाल्यावर परकीय चढाओढीपासून संरक्षण मिळण्यासाठी भारतांतील सायकलींच्या कारखानदारांनीं प्रयत्न सुरू केले. १९४३ सालीं ह्या धंद्यासंबंधीं चौकशी करण्यांत येऊन सायकलींच्या किंमतीवर घेण्यांत येणाऱ्या २४ टक्के आयात जकातीचें रूपांतर संरक्षणात्मक करांत करण्यांत आलें. मार्च १९४८ मध्यें परदेशीय सायकलींची किंमत १०९ रुपयांच्या खालीं आली तर आणि पुढील वर्षी ती १०० रुपयांच्या खालीं आली तर, सायकलीची किंमत तितकी राहील इतकी आयात जकात बसविण्याचें सरकारनें ठरविलें. ह्याशिवाय जे भाग देशांत तयार होत नाहींत ते आयात करण्यासाठी सर्व प्रकारच्या सवलती देण्याचेंही सरकारनें कबूल केलें. पण संरक्षण देऊन सुद्धा भारतांतील सायकलींचे कारखाने पुरेसें उत्पादन करू शकत नाहींत. हिंद सायकल कारखाना १९४७ सालीं ४०,००० सायकली आणि १९४८ सालीं ६०,००० सायकली तयार करू शकेल असा अंदाज होता. परंतु प्रत्यक्ष उत्पादन अनुक्रमें ३५,४०० आणि ४०,००० सायकलींचे झालें. हिंदुस्थान सायकल कारखाना १९४७ सालीं २५,००० आणि १९४८ सालीं ३५,००० सायकली उत्पादन करूं शकेल असा अंदाज होता. प्रत्यक्ष उत्पादन मात्र अनुक्रमें ८,००० आणि ८,३०० सायकलींचे झालें. योग्य किंमतींत हवा असलेला कच्चा माल न मिळणें, मजुरीचे वाढलेले दर आणि संप इत्यादी कारणांमुळें वरील कारखान्यांतील उत्पादन अपेक्षेप्रमाणें झालें नाहीं. भारतीय बनावटीच्या सायकली परदेशीय सायकलींपेक्षां जड असतात. सायकलींचे हलते फिरते भाग टिकाऊ नसतात. उदाहरणार्थ, सायकलीच्या चाकाची रिम घ्या. देशी रिम तीन ते चार वर्षेच जाते. परदेशी रिम सात ते आठ वर्षे टिकते. भारतीय सायकलींचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

टॅरिफ बोर्डानें सायकलींच्या कारखान्याला संरक्षण देण्यासंबंधीं चौकशी केली. चौकशींत असें आढळून आलें कीं भारतांत लोकप्रिय झालेल्या परदेशी सायकलींची किंमत ती बंदरांत आल्यावर ८६ रुपये पडते. ह्या किंमतींत आयातीचा कर धरलेला नाहीं. भारतीय सायकलींची विक्रीची सरासरी किंमतच १४० रुपये होते. म्हणून सायकलींवरील आयात कर २४ टक्क्यांवरून ६० टक्क्यापर्यंत वाढविण्यांत यावी अशी शिफारस टॅरिफ बोर्डानें केली. ही संरक्षणात्मक जकात बसविण्याचें सरकारनें कबूल केलें आहे. भारतांत दरवर्षी ३॥ लाख सायकलींची मागणी येईल असा अंदाज आहे. भारतांतील दोन कारखान्यांत मिळून फक्त ५०,००० सायकली तयार झाल्या. अर्थात् बाकीची मागणी सायकलींची आयात करून भागविणें जरूर आहे. ब्रिटिश कंपन्यांच्या सहकार्यानें दोन कारखाने काढण्यासाठी भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली आहे. कलकत्याच्या सेन-रॅले कंपनीचें भांडवल १ कोटी रुपयांचें आहे आणि टी. आय. सायकल्स ऑफ इंडिया ह्या कंपनीचें भांडवल ७० लाख रुपयांचें आहे. ह्या कंपन्या रॅले आणि हरक्युलस सायकली तयार करणार आहेत. १९५१ मध्ये हे दोन्ही कारखाने चालू होतील. प्रत्येक कारखाना दरवर्षी १,००,००० सायकली तयार करूं शकेल. सायकलींच्या धंद्यांतील तंत्रज्ञ शिकवून तयार करण्याची व्यवस्थाही करण्यांत आली आहे. देशी कारखान्यांचें उत्पादन वाढून सायकलींचा सांठा होईपर्यंत सरकारनें परदेशी सायकलींची पुरेशी आयात करण्याची परवानगी देणें जरूर आहे.

---

## भारत सरकारचें नवें कर्ज : आकर्षक अटी

भारत सरकार नवें कर्ज उभारीत आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| व्याजाचा दर | ३% ( करास पात्र ) |
| रक्कम | ३० कोटी रु. |
| किंमत | १०० रुपयांच्या रोख्यास १०० रुपये |
| परतफेड | १५ जून, १९६४ |
| विक्रीस प्रारंभ | १९ जून, १९५० |
| विक्रीची मुदत | २१ जून, १९५० अखेर |
| रोख्याचें स्वरूप | स्टॉक किंवा प्रॉ. नोट |

ह्या कर्ज उभारणीच्या अटींवरून कर्जरोखे विकत घेणाऱ्या लोकांना व संस्थांना कर्ज आकर्षक वाटेल, असा अंदाज करण्यांत येत आहे. व्याजाचा दर कर्जाच्या मुदतीच्या मानानें बरा आहे. २३/४ % १९५० चे ३५ कोटी रुपयांचे कर्जरोखे १६ जुलै रोजीं परत फेडीस पात्र होतात; त्यांचें नव्या कर्जरोख्यांत रूपांतर करणें फायदेशीर वाटेल अशी अपेक्षा आहे. रूपांतर करणारांना एका महिन्याचें जादा ३% व्याज मिळणार आहे, हाहि त्यांचा एक फायदा आहे. अशा रीतीनें रूपांतर करणारांचें हित पाहून कर्ज उभारणीचें यश निश्चित करण्याचा प्रयत्न सरकारनें केला आहे.

## औद्योगिक धोरण एकदा निश्चितपणें ठरवा की!

### श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांचें भाषण

पुणें येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या दि. ११ च्या वार्षिक साधारण सभेंत श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत सध्याच्या आर्थिक व औद्योगिक परिस्थितीचें दिग्दर्शन केलें. सरकारनें नेमलेल्या नियोजन मंडळाचें त्यांनीं स्वागत केलें, परंतु त्या संबंधांतील जे दोष डॉ. मथाई ह्यांनीं दाखवून दिले त्यांचा उच्चार श्री. किर्लोस्कर ह्यांनींहि केला. औद्योगिक धोरणांतील अस्थिरता काढून टाकण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. सरकारनें आपल्या देशाची अर्थव्यवस्था कोणत्या तात्त्विक भूमिकेवर अधिष्ठित राहील, याचा एकदा निश्चित निर्णय करावा, सोव्हिएट रशियांत चालू असलेली व्यवस्था येथें आणावयाची असेल तर राष्ट्रीयीकरणाची योजना हातीं घेऊन बिनदिक्कत पुढील उद्योगास लागावें, पण तसें शक्य नसेल तर जे उद्योगधंदे व व्यापार खाजगी प्रयत्नानेंच घडवून आणावयाचे त्यांचें क्षेत्र ठरवून घेऊन अशा उद्योगांना जरूर तें सर्व सहकार्य सरकारनें दिलें पाहिजे व त्यांच्या चालकांचा नियंत्रणांच्या नांवाखालीं दैनंदिन कोंडमारा करता कामा नये, असें त्यांनीं सांगितलें.

या वर्षाच्या मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकाचा रोखहि हे व्यवहार खासगी भांडवलदारांकडून घडवून आणण्याचा दिसतो, हें श्री. किर्लोस्कर ह्यांनीं मान्य केलें. परंतु कांहीं ठिकाणीं अद्याप ऐकूं येणारी राष्ट्रीयीकरणाची घोषणा व्यापारी व कारखानदार वर्गाला उगीच तंबी भरणारी आहे, सरकारच्या भावी धोरणाबद्दल कांहीच निश्चिति वाटत नाहीं, अशी त्यांनीं तक्रार केली. ते म्हणाले:— 'औद्योगिक विकास व्हावा असें सरकारला वाटत असेल व त्यासाठीं कल्पक आणि स्वतःच्या हिमतीवर उद्योग करणाऱ्या चालकांनीं पुढें यावें असें वाटत असेल तर अशा धंद्यांना निदान तीस वर्षें तरी सरकारकडून कसलाहि अडथळा होणार नाहीं व त्यांच्या प्रगतीला पूर्ण वाट मिळेल असें सरकारकडून निःसंदिग्ध आश्वासन मिळालें पाहिजे. एखादा कारखाना काढावयाचा तर, त्यापासून मिळणाऱ्या रास्त फायद्यासाठीं असा कारखाना वर सांगितल्याप्रमाणें निदान तीस वर्षें तरी त्या कारखानदाराच्या मालकीचा राहिला पाहिजे. त्याखेरीज त्याच्या श्रमाचा मोबदला त्याला मिळूं शकणार नाहीं, किंवा कोणताहि कारखाना नांवारूपाला येऊन त्याचें आसन मजबूत होणार नाहीं. यासाठीं निदान वर सांगितलेला अवधि तरी पाहिजेच. घरसोडीचें धोरण सोडून ठाम धोरण पत्करल्यावांचून हें जमणार नाहीं."

## हिंदी बँकिंगविषयीं ताजे आकडे

३१ मार्च, १९५० अखेरच्या तिमाहींत (१) सांगली बँक लि. सांगली आणि (२) बँक ऑफ इंदूर लि. इंदूर, ह्या दोन बँका शेड्यूल्ड बँकांच्या यादींत समाविष्ट करण्यांत आल्या. नवखाली युनियन बँक लि. कलकत्ता ही बँक शेड्यूलमधून गळाली. अशा रीतीनें शेड्यूल्ड बँकांच्या संख्येंत एकाची भर पडली.

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | ३१-१२-४८ | ३१-१२-४९ |
|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ३६८ | ३७७ |
| पांच प्रमुख बँका | ६७० | ६७४ |
| एक्सचेंज बँका | ६३ | ६५ |
| इतर शेड्यूल्ड बँका | १,९१४ | १,८०१ |
| | ३,०१५ | २,९१७ |

शेड्यूल्ड बँकांची तुलनात्मक परिस्थिति (कोटी रु.)

| | २५-३-१९४९ | ३१-३-१९५० |
|---|---|---|
| एकूण ठेवी | ९१६ | ८५५ |
| रिझर्व्ह बँकेंत ठेवलेली शिल्लक | ९० | ८३ |
| दिलेलीं कर्जें | ४९६ | ४६२ |
| कर्जाचें एकूण ठेवींशी प्रमाण | ५४% | ५४% |

### स्ट्रेप्टोमिसिनच्या वापराबद्दल इषारा

स्ट्रेप्टोमिसिन ह्या औषधाचा कांहीं प्रकारच्या क्षयावरच चांगला गुण येतो. तेव्हां ह्या औषधाचा उपयोग कोणत्या रोग्यावर करावयाचा, ह्याची चांगली माहिती असणारांनींच हें औषध उपयोगांत आणावें अशी सूचना भारत सरकारनें केली आहे. हें औषध कांहीं क्षयरोग्यांना मानवत नाहीं, इतकेंच नव्हे तर तें अपाय करतें.


### पुणें—लोणावळा मुंबई सीझन तिकिटांचे नवे दर

( १ जुलै १९५० पासून सुरू )

| | | | | | रु. |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ते | लोणावळा | मासिक | तिसरा वर्ग | ३२—११ |
| | | | त्रैमासिक | " | ८१—१२ |
| " | " | पुणें | मासिक | " | ५८—३ |
| | | | " | पहिला वर्ग | २४४—१२ |

**फुकटे प्रवासी**—भारतांतील आगगाड्यांतून तिकिटें न घेतां अगर अयोग्य तिकिटें घेऊन सुमारें ६ लाख लोकांनीं १९४८-४९ सालीं प्रवास केला. त्यांच्याकडून, १,५०,००,००० रुपये दंड वसूल करण्यांत आला.

**चीनमध्यें रशिअन चित्रपट**—१९५० सालीं चीनमध्यें दाखविण्यांत येणाऱ्या चित्रपटांपैकीं ७५ टक्के चित्रपट रशियन असतील असें समजतें. चीनमधील सरकारच्या स्टुडिओंतून १९५० सालीं २६ चित्रपट काढण्यांत येणार आहेत आणि ७६ रशिअन चित्रपटांना चिनी भाषेंतील संवाद जोडण्यांत येणार आहेत.



### देशी पेन्सिलीच्या धंद्यास संरक्षण देण्याचा प्रश्न

देशी पेन्सिलीच्या धंद्यास संरक्षण किंवा सरकारी मदत देण्यांत यावी या मागणीची चौकशी टॅरीफ बोर्ड करीत आहे. या धंद्याच्या भवितव्याचा दृष्टीनें मालाच्या दर्जास सर्वाधिक महत्त्व आहे. या धंद्यास १९०५ सालीं सुरवात झाली आणि गेल्या महायुद्धकाळांत परदेशी पेन्सिलींची आयात बंद झाल्याच्या परिस्थितीचा लाभ घेऊन या धंद्यानें खूप प्रगति केली. युद्धपूर्व काळांत जर्मनी, जपान, इंग्लंड, झेकोस्लोव्हाकिया आणि अमेरिका यांमधून आयात होणाऱ्या पेन्सिलींवरच भारत आपली बहुतेक गरज भागवीत असे. अलिकडे पेन्सिलींची बहुतेक आयात इंग्लंड व अमेरिका यांमधूनच होते.

**आयात उतरली–** १९४७–४८ सालांत जास्तींत जास्त पेन्सिली आयात झाल्या. त्या वर्षी ९.९३ लक्ष ग्रोस पेन्सिली आयात झाल्या व सुमारें १०७.८ लक्ष रुपयाइतकें परकी चलन खर्चावें लागलें. गेल्या दोन वर्षांत मात्र आयातीचें मान खाली आलें आहे. १९४६–४७ व ४७–४८ मध्यें पेन्सिलींची आयात सढळपणें करूं दिली जात होती तरी गेल्या दोन वर्षांत या वस्तूंवरील आयात निर्बंध कडक करण्यांत आले असून त्यामुळें या काळांत देशी धंद्याला खात्रीची बाजारपेठ मिळाली आहे.

**देवदारचा उपयोग–**अमेरिकन सेडर वूड स्लॅट हें पेन्सिली तयार करण्यास योग्य असतें असें कारखानदारांचें म्हणणें आहे. हरद्वार, पठाणकोटसारख्या ठिकाणीं उत्तर हिंदुस्थानांत मिळणाऱ्या देवदाराच्या लाकडावर योग्य ती प्रतिक्रिया करण्यांत आल्यास तें आयात सेडर लाकडाएवजीं चालूं शकेल. डेहराडून येथील जंगल संशोधन संस्थेंत आवश्यक तें संशोधन हातीं घेण्यांत आलें असून आतांपर्यंतच्या प्रयोगांतून देवदाराचें लाकूड हें उत्कृष्ट पेन्सिली तयार करण्यास चांगलें असल्याचें दिसून आलें. देवदारावर प्रतिक्रिया करणारीं दोन–तीन केंद्रें असावींत म्हणजे धंद्याची गरज भागूं शकेल असेंहि सुचविण्यांत आलें आहे. लाकडाइतकीच महत्त्वाची असलेली दुसरी वस्तू जी ग्राफाइट, तिच्याबाबतींतही आवश्यक संशोधन केल्यास जरूरीइतक्या शुद्ध स्वरूपांतील ग्राफाइट देशांतच मिळवणें कठीण जाणार नाहीं. या धंद्यास लागणाऱ्या इतर बहुतेक कच्च्या मालाची गरज देशी मालांतूनच भागविली जाते. येत्या तीन वर्षांत प्रतिवर्षी सुमारें ५ लक्ष ग्रोस पेन्सिलींची मागणी येईल असा अंदाज आहे.

---

**ताडी–कामगार गूळ तयार करणार**—मद्रास प्रांतांतील ७२,००० ताडी–कामगार दारुबंदीमुळें बेकार झाले होते. त्यांना आतां ताडीपासून गूळ तयार करण्याचें काम देण्यांत आलें आहे. ह्या कामासाठी मद्रास सरकारनें २,२५,००० रुपये आणि भारतीय सरकारनें १,०८,००० रुपये चालू सालीं मंजूर केले आहेत.

**ब्रिटनमधील जननसंख्या घटूं लागली–**युद्ध संपून ब्रिटनच्या लष्करांतील, हवाई दलांतील आणि नौकादलांतील लोक नागरी जीवनांत परत आल्यावर, ब्रिटनमधील जननसंख्या एकदम बरीच वाढली होती. आतां ती पुन्हां घटूं लागली आहे. तरी सुद्धां १९४८ साली ब्रिटनची लोकसंख्या ४,५२,००० नीं वाढली.

**दिल्ली येथील शेतकी कॉलेज–**दिल्ली येथील सेंट्रल कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर योग्य इमारतीच्या अभावीं आणि इतर अडचणीमुळें बंद करण्यांत येणार होतें. परंतु भारताचे नवीन अन्न मंत्री श्री. मुनशी ह्यांनीं कॉलेज चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हें कॉलेज ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूटला कायमचें जोडण्याचा विचार चालू आहे.


बेडेकर चे मसाले वगैरे

DR WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.

**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंबुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबा नजिक

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा ७. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.